# उत्तररंग

मार्च २०१४

प्रिय बृहन्महाराष्ट्रमंडळ प्रतिनिधी,

येणाऱ्या भारतीय नव्या वर्षाच्या शुभेच्छा ! उत्तररंग हा प्रकल्प बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या वतीने बरीच वर्षे सुरु आहे. या प्रकल्पाबद्दल नवीन माहिती देण्यासाठी आणि तुमच्या मंडळाच्या वतीने यासाठी काय करता येईल याची चर्चा करण्यासाठी हे पत्र लिहीत आहोत.

उत्तररंगासंबंधी एक वार्ता म्हणजे मार्चमध्ये बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या व्यासपीठावर एक सभा झाली. अर्थात दूरध्वनी सभा म्हणजे कॉन्फरन्स कॉल. (ही सभा कॅलिफोर्नियामध्ये होणार असे जाहीर केले असते तर तिकडे पूर्व भागात कुडकुडत असणारे आमचे मित्र प्रत्यक्ष यायला आनंदाने तयार झाले असते.) या सभेला विविध गावातल्या उत्तररंगी गटांचे (म्हणजे पन्नाशीच्या पुढच्या वयाच्या लोकांचे क्लब्ज) प्रतिनिधी होते. उदा: Washington डीसी "अग्रणी"चे देशपांडे. न्यू जर्सी "५५प्लस क्लब" चे मीना देशपांडे आणि जगदीश वासुदेव, लॉस एन्जेलिस "विरंगुळा" चे प्रमोद तेंडूलकर, शिकागोचे नीला व अशोक लेले. तसेच लॉस एन्जेलिस मराठी मंडळाचे अध्यक्ष सचिन सोनटक्के, बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या समितीचे सुनील सूर्यवंशी, नमिता दांडेकर आणि नितीन जोशी आले होते. प्रसाद पानवलकर यांना आयत्या वेळी काही अडचण आली. उत्तररंगाचे बृहन्महाराष्ट्रमंडळाचे कार्यकर्ते म्हणून विद्या व अशोक सप्रे होते. (आता आणखी काही गावात असे काम चालू असेल आणि त्या प्रतिनिधीनी आपण होऊन आम्हाला कळवले तर पुढील सभेची वेळ त्यांना नक्की कळवू. तुमच्या मंडळात असे उपक्रम सुरु असतील तर आम्हाला प्रतिनिधींची नवे कळवावीत.)

. हे सर्व लोक उत्तररंगावर वेगवेगळया वेळी एकमेकांना मदत करत असतात. गावोगावच्या 'बेबी बुमर्स' म्हणजे पन्नाशीपुढच्या वयाच्या मराठी लोकांची गरज लक्षात घेऊन बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या व्यासपीठावर सर्वांना एकत्र आणणे हे काम गेली अनेक वर्षे चालूही आहे. या दोन्हीचे फलित म्हणजे ही सभा आणि त्यामुळे ही सभा चांगली झाली.

सभेतल्या काही लोकांना प्रश्न होता की 'हा उत्तररंग क्लब कुठल्या भागाचा ?' नितीन जोशी यांनी या प्रश्नाचं समर्पक उत्तर दिलं की," उत्तररंग हा कोण्या एकाचा क्लब नाही तर ती संकल्पना आहे आणि अग्रणी, विरंगुळा, ५५ प्लस सारखे गट म्हणजे त्या संकल्पनेचा आविष्कार आहे." सुनील सूर्यवंशी यानी तो 'उत्तर'रंग उचलून धरला.

या उत्तरंगाचे दोन स्तर आहेत.

१. बृहन्महाराष्ट्रमंडळाचं व्यासपीठ
२. गावोगावचे आयुष्याच्या उत्तररंगावर काम करणारे गट किंवा उपक्रम.

'Think global act local' असे यामागचे सूत्र आहे.

बृहन्महाराष्ट्रमंडळाचं व्यासपीठ कशा साठी ? : ही ग्लोबल यंत्रणा आहे.

- गावोगावच्या स्थानिक गटांचे नेटवर्किंग करणे. ( अनुबंध हा मराठी प्रतिशब्द)
- मराठी मंडळांना उत्तररंग विभाग सुरु करण्यासाठी प्रेरणा आणि उपक्रम करण्यासाठी मार्गदर्शन.
- वर्षातून तीन ते चार गावात उत्तररंग विषयक परिषदा घडवून आणणे. त्यासाठी शक्य तिथे विभागीय प्रतिनिधी आणि कार्यकर्ते नेमणे.
- अधिवेशनात या विषयात परिसंवाद.
- वृत्तात उत्तररंग सदर आणि संकेतस्थळावर ( वेबसाईट) माहिती व प्रसार.
- माहितीपुस्तिका म्हणजे उत्तररंग नामदर्शिकेसारखी प्रकाशने.

गावोगावचे उत्तरंग विषयक गट अथवा उपक्रम कशासाठी ?: या लोकल यंत्रणा आहेत.

या यंत्रणा दोन प्रकारे होऊ शकतात.

<u>एक</u> म्हणजे स्थानिक मराठी मंडळाची समिती पन्नाशीच्या प्रौढांसाठी विभाग आणि उपक्रम सुरु करते. मराठी मंडळ लॉस एंजेलिसने पुढाकार घेऊन 'विरंगुळा' हा उपक्रम सुरु केला आणि त्याचे तीन गावात कार्यक्रम होतात.

<u>दुसरा</u> प्रकार म्हणजे हे पन्नाशीचे प्रौढ आपण होऊन असा उपक्रम सुरु करतात. कारण पुष्कळदा मराठी मंडळाची समिती चाळिशीच्या आतली असते. मंडळाच्या कार्यक्रमाचे स्वरूप लहान मुले व त्यांचे तरूण आईबाप यांचे भोवती असते. अशा वेळी पन्नाशीच्या वरचे लोक मंडळावर प्रेम असूनही कार्यक्रमांपासून थोडे दूर जातात. एकत्र जमू लागतात. त्यातून अग्रणी व ५५ प्लस क्लब सारखे गट सुरु झाले. सुरवातीला मजा म्हणून जमणारे हे गट सहली आणि भोजनावली यांची माहितीप्रद व्याख्याने, मनोरंजन, पुस्तक संघ, छन्दवर्ग, आधार गट या उपक्रमांशी सांगड घालू लागले.

यंत्रणा कोणत्याही प्रकारची असो: मराठी मंडळाचा भाग अथवा समांतर ! ती चालू ठेवण्यासाठी दोन तीन तरी व्यक्तीचे भक्कम नेतृत्व लागते. कार्यकर्त्यांचे श्रम लागतात.

या व्यासपीठावरून काय काय होते ?

- प्रत्यक्ष कार्यक्रमांची योजना आणि ते घडवून आणणे.
- यात गम्मत मेळावे, छंद वर्ग, या वयातील नवीन करीयरसाठी मार्गदर्शन, चर्चासत्रे, परिषदा, सहली, व्याखाने, वाढदिवस, स्पर्धा, अशा कितीतरी गोष्टी आहेत.

आमच्या सभेतील संवादातून हे सर्व विषय बोलले गेले. ठरले काय तर या दोन स्तरांवर एकत्रितपणे  काय करायचे याची योजना:

१. बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या पातळीवर:
    - ५४ मराठी मंडळांना ईपत्राने कळवले जाईल.
    - या मंडळांच्या एकत्र सभेत माहिती सांगून मंडळ पातळीवर उत्तररंग उपक्रम सुरु करावा म्हणून उत्तेजन दिले जाईल. त्यासाठी मार्गदर्शनाची सोय केली जाईल.
    - उत्तररंग नामदर्शिकेचा प्रचार केला जाईल.
    - मराठी शाळेच्या मासिक सभेसारखी उत्तररंग सभा आयोजित केली जाईल.
    - गुगल ग्रुप आहे, त्याचा प्रसार केला जाईल.
२. स्थानिक मंडळांच्या पातळीवर काय करता येईल ?
    - आपल्या उपक्रमांची माहिती वेळोवेळी वृत्तास पाठवणे.

- आपल्या भागातील लोकांना काय हे आहे, कोणत्या प्रकारचे मार्गदर्शन पाहिजे, त्याचे सर्वेक्षण ( म्हणजे सर्व्हे बरं का ) करून त्याचा अहवाल बृहनमहाराष्ट्र मंडळाला पाठवणे.

( हे काम तर या सदराचे वाचकही आपापल्या मित्रांशी बोलून करू शकतील.)

- आजूबाजूच्या गावात असे उपक्रम सुरु करण्यास मदत करणे.
- बृहन्महाराष्ट्र मंडळाने परिषद आयोजित केली तर मदत करणे.
- माहिती बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेत स्थळावर देणे.
- उत्तररंग सभेत आणि गुगल ग्रुपमध्ये भाग व कल्पना आणि विचारांची देवाणघेवाण.
- उत्तररंग नामदार्शिकेचा प्रचार व विक्री.
- हे उपक्रम मराठी लोकांपुरते मर्यादित ना राहता जर शक्य असेल तर अन्य भारतीय लोकांनाही ते खुले असावेत. आपण मंदिर नावाच्या अन्य भारतीय लोकांच्या संस्थेत जातो व फायदा घेतो. ( काही मंदिरात मराठी शाळाही भरतात.) मग मराठी नेतृत्वाखाली असलेले उत्तररंग सर्व भारतीय लोकांसाठी का असू नये ?

**तेव्हा या कामाची सुरवात म्हणून आपल्या भागातल्या मराठी मंडळाच्या वतीने तुम्ही पुढील गोष्टी कराव्यात अशी विनंती आहे:**

1. मंडळाच्या अध्यक्षाने आपल्या मंडळातून दोन उत्तररंग प्रतिनिधी नेमावेत व त्यांचे इमेल पत्ते पाठवावेत. त्यांना आम्ही उत्तररंग गुगल ग्रुप मध्ये प्रवेश देऊ.
2. तुमच्या मराठी मंडळात उत्तररंग विभाग नसेल तर तो सुरू करावा. त्यासाठी मार्गदर्शन करण्याची व्यवस्था बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आम्ही करू. पुढील उत्तररंग बैठकीस उपस्थित रहावे.
3. तुमच्या भागात अथवा मंडळात पन्नाशीच्या वरील सदस्यांसाठी असा काही उपक्रम असेल, तर आम्हाला आणि अन्य मराठी मंडळांना त्यांची माहिती द्यावी. बृहन्महाराष्ट्र वृत्तात आम्ही ती प्रसिद्ध करू.
4. आपल्या www.bmmonline.org या संकेत स्थळावर म्हणजे वेब साईट वर उत्तररंग विषयावर माहिती व अनेक लेख आहेत. ते वाचावेत. वृत्ताचे जुने अंक आहेत. त्यातील लेखही वाचावेत.

शेवटी सांगायचं तर स्तर कोणताही असो. प्रत्येक मराठी माणसाला उत्तररंग जिव्हाळ्याचा वाटला तरच आपण पुढे जाऊ शकू. तेव्हा पुढील पत्यावर संपर्क साधा:

उत्तररंग सदरासाठी: ashoksapre@gmail.com अशोक सप्रे

उत्तररंगमंच सभेसाठी: namitadandekar@yahoo.ca नमिता दांडेकर

गुगल ग्रुप चे नाव: Uttarrang त्यात भाग घेण्यासाठी: vidyahardikar@gmail.com

कळावे,

प्रतिसादाच्या अपेक्षेत आपले ,

नमिता दांडेकर, सुनील सूर्यवंशी, अशोक सप्रे